**चेतना सिन्हा**

**मुंबईत जन्मलेल्या आणि वाढलेल्या स्त्रीने पुढील आयुष्य जगण्यासाठी म्हसवड सारख्या ग्रामीण आणि दुष्काळी भागात यावे हेच मुळात आश्चर्य. अशा परिसरात येऊन त्यांनी महिलांना आर्थिक बळ देणारी चळवळ उभी केली, विकासाचा मार्ग दाखविला. 'माणदेशी महिला सहकारी बँके'च्या माध्यमातून या परिसरात परिवर्तनाची लाट आणण्यात त्यांना यश आले. चेतना सिन्हा यांच्या या चिकाटीपूर्ण प्रवासाबद्दल...**

गाढवांच्या खरेदीसाठी कोणती बँक एखाद्या अशिक्षित बाईला कर्ज देईल का? होय. म्हसवडमधील एक बँक अशा 'खरेदी'साठीही कर्ज देते ! माणदेशी महिला सहकारी बँकेने हे पाऊल उचललेले आहे...! ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी या बँकेने आपल्या आजवरच्या १५ वर्षांच्या वाटचालीत असे अनेक उपक्रम अंमलात आणले, अनेक निर्णय घेतले आणि त्यातून त्या महिला आत्मविश्वासाने वावरू लागल्या. बँकेबरोबरच 'माणदेशी फाउंडेशन' या ट्रस्टच्या वतीने सुद्धा अनेक उपक्रम प्रत्यक्षात आले. हा आत्मविश्वास ज्या बँकेमुळे आणि फाउंडेशनमुळे आला त्या संस्थांची निर्मिती झाली ती चेतना सिन्हा यांच्यामुळे. मूळच्या मुंबईच्या असलेल्या चेतना सिन्हा विवाहानंतर म्हसवडमध्ये आल्या आणि या परिसरात त्या इतक्या समरस झाल्या, की त्यातूनच दुष्काळी माणदेशात महिला उद्योजकतेसाठीचे 'सुपिक रान' तयार झाले.

चेतना सिन्हा मूळच्या मुंबईच्या. त्यांचे वडील मदनलाल खिमजी गाला यांचे नळबाजार - भेंडीबाजार भागात एक दुकान होते. कुमकुमबेन आणि मदनलाल यांच्या कुटुंबात जन्मलेली ही तिसरी मुलगी. त्यांचा जन्म २१ मार्च १९५८ रोजीचा. मुलगी म्हणून जन्माला आली तरी चेतना यांच्यावर तशी कुठलीही परंपरागत बंधने नव्हती. शिक्षण इंग्रजी माध्यमाच्या शाळेत झाले. बाहेरच्या जगाचे भरपूर 'एक्स्पोजर' त्यांना मिळत गेले. मास्टर्स ट्युटोरियल हायस्कूलमधून शालेय शिक्षण पूर्ण करीत साधारण १९७५ मध्ये त्या मुंबईच्या लाला लजपतराय कॉलेजात कॉमर्स शाखेत दाखल झाल्या. योगायोगाने त्याच काळात इंदिरा गांधी यांनी देशावर आणीबाणी लादली. त्याविरोधात देशभर सुरू झालेल्या चळवळीचे नेतृत्व जयप्रकाश नारायण यांच्याकडे आले. त्यांच्या नेतृत्वाखाली प्रभावित होऊन देशभरात लक्षावधी युवक रस्त्यावर उतरले. चेतना त्यापैकीच एक. आणीबीणीविरोधी आंदोलनातून बांधल्या गेलेल्या संघटनेतून काही कायमस्वरुपी काम उभे राहावे या उद्देशाने प्रेरित होऊन ग्रामीण भागात काम करण्याच्या दृष्टीने या गटाने पुढाकार घेण्यास सुरवात केली. देश बदलायचा तर ग्रामीण भागात काम उभे राहिले पाहिजे, या जिद्दीतून त्यांचे लक्ष ग्रामीण भागाकडे वेधले गेले. त्यानंतरच्या काळात 'मराठवाडा विद्यापीठा'च्या नामांतराचा प्रश्न समोर आला आणि त्या आंदोलनात चेतना ओढल्या गेल्या. या आंदोलनाला व्यापक प्रसिद्धी मिळत होती. आंदोलनात विजयसिंह गुरव नावाचा तरुणही हिरीरीने सक्रीय असे. साऱ्या आंदोलनांत हा तरुण अग्रभागी असे. असेच एकदा एका नियतकालिकाने छापलेल्या बातमीमध्ये का कोण जाणे पण विजयसिंह गुरव यांचे नाव विजयसिंह सिन्हा असे छापले गेले. खरे तर त्या काळात हे कार्यकर्ते आपली आडनावे फारशी लावतच नसत. पण त्या बातमीदाराला 'विजयसिंह' या नावापुढे 'सिन्हा' लावावेसे वाटले आणि हे नवे नाव त्यांना चिकटले ते कायमचेच. याच काळात चेतना आणि विजयसिंह यांचा परिचय झाला आणि दोघांच्याही आयुष्याची वाट एकच आहे, हे त्यांच्या लक्षात आले.

आंदोलनांत चेतना सतत सक्रीय असत. बिहारमधील वेठबिगारीविरोधी आंदोलन असो की औरंगाबादेतील नामांतर आंदोलन, त्यांच्या या सक्रीयतेतून ६ डिसेंबर १९७९ रोजी त्यांना अटक झाली आणि येरवडा तुरुंगात चक्क १३ दिवसांचा कारावास भोगावा लागला. त्यांच्या घरासाठी ही धक्कादायक घटना होती, पण वडिलांनी त्यांना स्वातंत्र्य दिले होते. आपल्या मुलीवर त्यांचा पूर्ण विश्वास होता. १९८१ मध्ये महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करीत मुंबई विद्यापीठातून 'एम.कॉम.' झाल्यानंतर १९८३-८४ मध्ये त्यांनी प्राध्यापकी पेशा स्वीकारला. त्याच काळात शरद जोशी यांच्यासोबत काम करीत त्यांनी शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीची धुराही सांभाळली.

सन १९८७ मध्ये विजयसिंह सिन्हा यांच्याशी विवाहबद्ध झाल्यानंतर बाहेरच्या चळवळींचे प्रमाण थोडे कमी झाले. वाढलेली जबाबदारी हे जसे एक कारण होते तसेच 'चळवळींद्वारे परिवर्तन घडू शकेल' या विचाराचा झालेला भ्रमनिरास हे ही दुसरे महत्वाचे कारण होते. परिवर्तनासाठी स्थायी स्वरुपाची कामे उभी केली पाहिजेत, याची खात्री त्यांना याच काळात पटली. विवाहानंतर त्या म्हसवडमध्ये आल्या आणि तेथे काही काम उभे केले पाहिजे या दृष्टीने विचार करू लागल्या. आर्थिक उत्पन्नाच्या दृटीने काही छोटे-मोठे प्रोजेक्ट मिळवून कामे करतानाच त्यांच्या मनात आपल्या गावात बँक सुरू करण्याचा विचार घोळू लागला. हा विचार डोकावण्याची सुरवात झाली १९८७-८८ मध्येच. दरम्यान १९८८ मध्ये पंचायत निवडणुकीत महिलांचे स्वतंत्र पॅनल उभे करण्याचा प्रयोगही त्यांनी केला!

पॅनलचा प्रयोग यशस्वी ठरला नाही, पण या निमित्ताने चर्चा सुरू झाली. महिला एकत्र येऊ लागल्या. हा साराच भाग दुष्काळी. त्याच महिलांचे उत्पन्न काय असणार? पण उत्पन्न कितीही असले तरी महिला बचत करण्याच इच्छुक असतात, हे चित्र चेतना यांच्यासमोर दिसू लागले. पण ही बचत करायची तर एखादी यंत्रणा हवी. बँकेत जाऊन बचत करणे महिलांना शक्य वाटत नव्हते. त्यांना दररोजची बचत आवश्यक होती. काम संपवून हाती पैसा येताच त्यातील बचतीचा वाटा बाजूला पडला पाहिजे. कारण तो पैसा एकदा घरी गेला की संपून जातो, हाच सर्वांचा अनुभव होता. या साठी स्वतःचीच बँक असावी अशी कल्पना महिलांनीच मांडली. हा विचार चेतना यांच्या मनात तर आधीपासूनच घोळत होता. हळू हळू या कल्पनेला आकार येऊ लागला. रिझर्व्ह बँकेच्या नियमांची माहिती त्यांनी मिळविली होती. त्या दृष्टीने आवश्यक असलेल्या मार्गदर्शकांशी त्यांचा जुनाच संपर्क होता. त्यातून बँकेसाठीचे प्रपोजल तयार झाले. म्हसवड नगरपालिकेला 'ड' दर्जा होता. त्यानुसार सहा लाखांचे 'शेअर कॅपिटल' त्यांना आवश्यक होते. हा पैसा सर्वांनी मिळून कसाबसा उभा केला आणि प्रस्ताव रिझर्व्ह बँकेकडे रवाना झाला. तेथे गेल्यानंतर

अधिकाऱ्यांच्या लक्षात आले, की पाचही संचालिकांच्या सहीच्या ठिकाणी सर्वांनी अंगठ्याचा ठसा उमटविला आहे! 'प्रोमोटिंग मेंबरच नॉनलिटरेट असतील तर लायसन्स कसे देता येईल? बँक कशी चालणार?' असा आक्षेप घेत रिझर्व्ह बँकेने हा प्रस्ताव फेटाळून लावला आणि सर्व महिलांनी तीन वर्षांची मेहनत पाण्यात गेली.

पण निराश होऊन हट्ट सोडतील, अशा या महिला नव्हत्या. तीन वर्षांच्या तयारीत त्यांच्यात मोठा आत्मविश्वास आला होता. आपल्या निरक्षरतेमुळे हा प्रस्ताव फेटाळला गेला, याचे त्यांना अतीव दुःख झाले. 'प्रस्ताव फेटाळण्यामागे एवढेच कारण असेल तर आम्ही लिहायला - वाचायला शिकू,' अशी तयारी त्यांनी दाखविली आणि चेतना सिन्हा यांची पुढची तयारी सुरू झाली. या महिलांचे शिकण्याचे वर्ग सुरू झाले. त्यांना लिहिता - वाचता येऊ लागले. आपली सही त्या स्वतः करू लागल्या. पुन्हा एकदा प्रस्ताव तयार झाला. या साऱ्या काळात चेतना यांच्या असे लक्षात आले की या महिला अशिक्षित असल्या तरी त्यांना खूप काही कळते. त्यांच्यात जिद्द आहे, स्वतःला सिद्ध करण्याची मानसिकता आहे. त्यांच्यातील ही ताकद नव्याने प्रस्ताव सादर होताना वापरता येणार होती.

बँकेसाठी नव्याने प्रस्ताव तयार झाला. या वेळी हा प्रस्ताव सादर करण्यासाठी सगळ्या १७ जणी मिळून रिझर्व्ह बँकेकडे गेल्या. परत तोच प्रस्ताव आल्याचे पाहून 'सीजीएम'ने त्यांना बाहेरच्या बाहेरूनच टाळण्याचा प्रयत्न केला. पण चिकाटीने त्यांनी आत प्रवेश मिळविला. आपली भूमिका त्यांनी अतिशय संयतपणे अधिकाऱ्यांपुढे मांडली. ''आपण आमचा प्रस्ताव फेटाळला तरी ठीक आहे. पण आमची बाजू समजावून तरी घ्या. आम्ही वाढलो तेव्हा आमच्या गावात शाळा नव्हती. ही आमची चूक नाही. पण आमच्याकडे व्यवहारज्ञान आहे. आम्हाला मुद्दल रकमेचे व्याज मोजायला सांगा. तुमच्या अधिकाऱ्यांना कॅल्क्यूलेटरच्या साह्याने तेच काम सांगा. त्यांच्या आधी आम्ही हे काम करून दाखवू. इथल्या सिस्टिममुळे आम्ही मागे पडलो, पण म्हणून आम्हाला व्यवहार जमत नाही, असे नाही...'' आणि खरोखरच त्यांनी तिथल्यातिथे हिशेब करून दाखविले. या महिला जिद्दीने साक्षर झाल्याचे प्रत्यंतरही संबंधित अधिकाऱ्यांना आले.

एवढे झाल्यानंतरही त्यांची खात्री पटेना. बँक कशासाठी हवी? नफा मिळाला नाही तर बँक बुडेल याची तुम्हाला माहिती आहे का? बँकेचा विकास कसा कराल? कर्ज कसे देणार? कर्जफेड कशी होणार? ... एक ना दोन असंख्य मुद्दे. सव्वाअकरा वाजता पाच मिनिटांसाठी म्हणून आत गेलेल्या महिला बारा वाजेपर्यंत आतच होत्या. सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळाली आणि सीजीएम परमार यांनी निर्णय दिला - 'परवानगी देऊ.' सर्वांच्याच आनंदाला पारावार उरला नाही!

रिझर्व्ह बँकेचा परवाना मिळाला आणि 'माणदेशी महिला सहकारी बँके'चा शुभारंभ १० ऑगस्ट १९९७ रोजी झाला. बँकेसाठी आवर्जुन तळमजल्यावरील जागा मिळविली. उद्घाटन समारंभ झाला. सारे घरोघरी परतले. आता दुसऱ्या दिवसापासून बँकेत महिलांच्या रांगा लागतील, अशीच अनेकींची अपेक्षा होती. पण सर्वांचाच भ्रमनिरास झाला. दिवसभरात कोणीच बँकेत फिरकले नाही! यातून मार्ग काढला पाहिजे, असे सर्वांच्याच लक्षात आले. आता चेतना सिन्हा यांची कसोटी लागणार होती. त्यांच्या आग्रहातून आणि स्वप्नातून बँक साकार तर झाली होती, आता ती नीटपणे चालायलाही हवी होती. मग त्यांनी महिलांच्या भेटीगाठी सुरू केल्या. त्यापैकी कोणीही घर सांभाळणाऱ्या गृहिणी नव्हत्या. हातावर पोट असलेल्या त्या कष्टकरी महिला. कोणी मजुरी करीत, कोणी भाजी विकत, कोणी आणखी कसला तरी व्यवसाय करीत. अशा सर्वांच्या भेटीगाठी सुरू झाल्या, तशी वस्तुस्थिती समोर येऊ लागली. कोणी सांगे - 'आम्हाला वेळ नाही.' कोणी म्हणे, 'आज कर्ज घेऊ पण उद्या फेडता आले नाही तर बँकेचे लोक भर रस्त्यात आमची इज्जत काढणार...' या सर्वांची मानसिकता लक्षात येऊ लागली आणि हे आव्हान खूप मोठे आहे हे त्यांना कळू लागले.

चेतना यांच्या हे लक्षात येऊ लागले, की या महिलांपैकी कुणालाही बँकेत येण्यासाठी वेळ नाही. मग बँकेने त्यांच्याकडे गेले पाहिजे, असे त्यांनी ठरविले. या महिला आपल्या रोजच्या कमाईतून काही वाटा बाजूला काढू शकतात पण रोजच्या रोज बँकेत भरणा करणे शक्य होणार नाही ही वस्तुस्थिती होती. मग, त्यांच्या ठिकाणी जाऊन हा पैसा गोळा करणे आणि तो बँकेत आणून त्यांच्या खात्यात जमा करणे हा मार्ग समोर आला. 'डेली बँकिंग', 'डोअरस्टेप बँकिंग'च्या संकल्पना त्यातून समोर येत गेल्या. ही नावे मोठी वाटली तरी त्यांच्या बचतींचे आकडे खूप छोटे छोटे होते. हा पैसा जमविण्यासाठी त्यांनी महिला प्रतिनिधींची नियुक्ती केली. त्यातून बचतीची सुरवात तरी झाली. चेतना यांच्या असेही लक्षात आले, की अशीच छोटी छोटी खाती या बँकेत येणार. आणि महत्वाचे म्हणजे मोठी उलाढाल असणाऱ्यांनी या बँकेत यावे असे या बँकेकडे आहे तरी काय? छोटे छोटे पाऊल टाकत ही सुरवात तरी झाली.

नाव 'बँक' असले तरी त्यातून काही रचनात्मक काम उभे राहिले पाहिजे याची जाणीव त्यांना आधीपासून होती. कारण चेतना सिन्हा यांचा मूळ पिंड चळवळीचा. महिलांना आत्मविश्वास देणे, त्यांना मालकी हक्काची जाणीव देणे, त्यांच्या गरजेला पाठीशी उभे राहणे या साऱ्या भूमिका त्यांना आणि बँकेला पार पाडायच्या होत्या. पण महिलांच्या अपेक्षा इतक्या वाढत गेल्या की आपल्या वस्तीतील दारूचे दुकान बंद करायचे तर त्यासाठीही बँकेने मदत केली पाहिजे, असा त्यांचा आग्रह असायचा. त्यातील भावना लक्षात घेऊन चेतना यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसह त्या लढ्यांतही सहभाग दिला! कर्मचाऱ्यांनी अशा सहभागाला विरोध दर्शविला तेव्हा त्यांनी समजावून सांगितले, 'जोवर घरातील पुरूष दारू पिणार तोवर बाईचा पैसा बाजूला पडणार नाही. आणि हा पैसा बाजूला पडला नाही तर मग त्या बँकेत पैसा कसा भरणार?' हा युक्तीवाद कर्मचाऱ्यांनाही पटत असे.

हळूहळू बँकेच्या कामाला वेग येऊ लागला. पहिल्या वर्षी ६ लाखांचे शेअर आणि ६६ लाखांचे डिपॉझिट जमा झाले. नियमाप्रमाणे भागभांडवलावर ७५ टक्के कर्जवाटपही झाले. पहिले वर्ष सुरळीतपणे पार पडल्यानंतर सर्वांचाच आत्मविश्वास वाढला. बँकेच्या व्यवहारांना आता चळवळीचे रुप येऊ लागले होते. ग्रामीण भागातील महिलांना बचतीसाठी प्रोत्साहित करायचे तर त्यांच्यातील उद्योजकवृत्तीला प्रोत्साहन दिले पाहिजे, हे चेतना यांच्या लक्षात आले. त्यातून वेगवेगळ्या संकल्पना जन्म घेऊ

लागल्या. महिलांना कर्ज देताना तो पैसा अंतिमतः महिलांच्याच नियंत्रणात राहिला पाहिजे या दृष्टीने त्यांनी दूरगामी निर्णय घेतले. उदाहरणार्थ 'चिकन्स'साठी कर्ज दिले जाते पण पोल्ट्रीफार्मसाठी नाही! गायी - म्हशी घेण्यासाठी कर्ज मिळते पण डेअरी सुरू करण्यासाठी नाही! रस्त्यावर भाजीपाला विकणाऱ्या महिलांसाठी एक आगळी योजना त्यांनी आणली. उन्हापावसात राबणाऱ्या या महिलांना दिलासा मिळावा म्हणून 'छत्रीसाठी बिनव्याजी कर्जा'ची योजना अंमलात आणली गेली. सारा स्टॉल झाकला जाऊ शकेल, अशा मोठ्या आकाराच्या छत्र्या त्यांनी बँकेतर्फे खरेदी केल्या आणि बिनव्याजी कर्जाच्या योजनेत वितरीत झाल्या. महिलांच्या गरजांतूनही काही योजनांचा जन्म झाला. २००३ मध्ये आस्मा तांबोळी नावाची एक मुलगी बँकेत काही काम मागण्यासाठी आली होती. सुटीच्या काळात काम करून मिळणाऱ्या पगारातून एक सायकल घेण्याची तिची इच्छा होती. कारण पुढील शिक्षणासाठी तिला दूर अंतरावर जावे लागणार होते आणि सायकल घेता येईल एवढे पैसे तिच्या पालकांकडे नव्हते. तिने सुटीत नोकरी केली आणि त्या आधारावर सायकल घेतली. यातून नव्या योजनेने जन्म घेतला. मुलींना सायकल खरेदीसाठी बँकेने बिनव्याजी कर्ज देण्यास सुरवात केली. मुलींची शाळेची सोय तर झालीच पण मुलांप्रमाणे सायकलवरून फिरताना, घरची कामे करताना त्यांचा आत्मविश्वासही लक्षणीयरित्या वाढला!

गटकर्जवाटप योजनेत वाळू वाहतुक करणाऱ्या महिला, चहाची गाडी चालविणाऱ्या, वडापाव विकणाऱ्या, पावभाजीचा गाडा चालविणाऱ्या, दूध विक्री करणाऱ्या, किराणा दुकान - खानावळ चालविणाऱ्या, बुरुड काम करणाऱ्या महिलांना कर्जवाटप करण्यात येते. गटकर्ज हा काय प्रकार आहे? पाच महिलांनी एकत्र येऊन 'जॉइंट लायबिलिटी ग्रुप' स्थापन करायचा. म्हणजे आपोआपच परस्पर अंकुश राहून काम होते! पाच महिलांच्या अशा ग्रुपला हे कर्ज दिले जाते. अशा उपक्रमांतून महिलांच्या उद्योजकत्वाला प्रोत्साहन देतानाच 'माणदेशी फाउंडेशन'च्या माध्यमातून त्यांना मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देण्याची योजनाही चेतना सिन्हा यांनी आखली. माणदेशी महिलांसाठी 'माणदेशी उद्योगिनी' नावाने व्यवसाय प्रशिक्षण शाळा सुरू करण्यात आली. गरजू महिलांना व्यवसायासाठी मार्गदर्शन करण्याच्या या योजनेत आजवर सुमारे ४० हजार महिलांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. म्हसवड, वडूज, दहीवडी, सातारा व हुबळी येथील शाखांच्या माध्यमातून हे अभ्यासक्रम चालविले जातात. विशेष म्हणजे कर्ज घेणाऱ्या प्रत्येक महिलेला आर्थिक साक्षरता प्रशिक्षण आवश्यक केलेले आहे. केवळ 'पापड' आणि 'कापड' या दोनच विषयांपुरते महिलांचे विश्व मर्यादित राहता कामा नये, या साठी त्यांना सर्वांगीण प्रशिक्षण मिळेल, असा त्यांचा प्रयत्न होता. संगणक प्रशिक्षण, व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण, शेळीमेंढी पालन, कुक्कुटपालन, गांडुळखत निर्मिती, रेशीम उद्योग आदी प्रकारचे शेतीविषयक विविध अभ्यासक्रम येथे घेतले जातात. त्याशिवाय फॅशन डिझायनिंग, ब्यूटीपार्लर, पाक कला, एम्ब्रॉयडरी, फोटो लॅमिनेशन या सारखे अभ्यासक्रमही येथे आहेत. गावोगावच्या महिला व मुलींना या प्रशिक्षणाचा लाभ घेता यावा या साठी बँकेने 'फिरती व्यवसाय शाळा' हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. विशेष प्रकारे तयार करून घेतलेल्या एका बसमध्ये प्रशिक्षणाचे हे सारे साहित्य असते आणि ही बस सहजपणे सर्वत्र संचार करीत असते! या बसमध्ये कॉम्प्यूटरही असतो आणि शिलाई मशीन्ससुद्धा! याशिवाय शेतीविषयक विविध कार्यशाळांचे आयोजन ट्रस्टतर्फे करण्यात येते. रोपवाटिकांसाठीचे मार्गदर्शनही त्यात होते.

हे प्रोत्साहन देत असतानाच आणखी एक आगळा प्रयोग त्यांनी केला आहे. 'हजारो देशी उद्योजिका' या कार्यक्रमात सहभागी होऊन व्यवसायात भरीव प्रगती करून दाखविणाऱ्या महिलांना मागील दोन वर्षांपासून १३ एप्रिल रोजी खास कार्यक्रमात अनुक्रमे २५, १५ व १० हजारांचे पारितोषिक देण्यात येते आणि त्यांना 'देशी एमबीए'चे प्रमाणपत्रही देण्यात येते! याच अंतर्गत आणखी एक अनुकरणीय प्रयोग त्यांनी केलेला आहे. सातारा येथून प्रकाशित होणाऱ्या 'ऐक्य' या दैनिकात त्या दर आठवड्यातून एका यशस्वी महिला उद्योगिनीची यशकथा समाजासमोर आणतात. आजवर सादारण २५ महिलांच्या यशकथा समोर आल्या असून त्यातून अनेक महिलांना प्रोत्साहन मिळत आहे.

प्रोत्साहनाचे एक मूर्तीमंत उदारहण म्हणजे वनिता पिसे यांची यशकथा. सन २००६ मध्ये 'सीआयआय'च्या व्यासपीठावरून साक्षात पंतप्रधानांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात आले. त्या द्रोण-पत्रावळी तयार करण्याचा व्यवसाय करतात. या द्रोण-पत्रावळी कागदाच्या असतात. मुळात त्यांनी म्हशीसाठी कर्ज घेतले होते. ते काम करून त्या उरलेल्या वेळेत मजुरी करीत. त्यानंतर कर्ज घेऊन त्यांनी हा व्यवसाय सुरू केला. आता त्यांच्याकडे १२ मशीन्स आहेत आणि दररोज सहा हजार द्रोण पत्रावळी करण्याची त्यांची क्षमता आहे! अशा उद्योजिकांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांच्या उत्पादनांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी 'माणदेशी मार्केटिंग महोत्सवा'चे आयोजनही बँकेतर्फे करण्यात येते. यामधून महिलांना आपली उत्पादने थेट ग्राहकांसमोर मांडण्याची संधी मिळते.

महिला उद्योजिकांना प्रोत्साहन देतानाच समाजात काही चांगली नीतीमूल्ये रुजावीत या साठी त्यांनी 'माणदेशी तरंग वाहिनी' या कम्युनिटी रेडिओ केंद्राचीही सुरवात २००९ मध्ये केली. महिलांद्वारे चालविले जाणारे हे महाराष्ट्रातील पहिले रेडिओ केंद्र ठरले. महिलांच्या प्रशिक्षणाबरोबरच स्त्री-भ्रुणहत्येसारख्या संवेदनशील विषयांवरील जनजागृती या केंद्रावरून करण्यात येते. रेडिओवरून हे उपक्रम चालू असतानाच मैदानी खेळांमध्येही मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी बँक पुढे येते. 'माणदेशी चॅम्पियन क्रीडा संकुला'त दरवर्षी क्रीडा महोत्सव भरतो. वर्षभर या खेळाडूंना प्रशिक्षण देण्याची सुविधा असते. धावणे, बॅडमिंटन, व्हॉलीवॉल, फुटबॉल, मल्लखांब, खोखो, कब्बड्डी, लांब उडी, उंच उडी, थाळीफेक, थ्रोबॉल अशा विविध खेळांचा या प्रशिक्षणात समावेश असतो. माणदेशातील भावी पिढी क्रीडाक्षेत्रातही नावारुपाला यावी, असा या मागचा प्रयत्न आहे.

बँकेतर्फे 'इ कार्ड' हा असाच महत्वाकांक्षी कार्यक्रम नुकताच राबविण्यात आला. महिलांना संगणकीकृत योजनेतून बचत खात्यांसाठी कार्ड देण्यात आली. आता त्यांना पासबुक सांभाळण्याची गरज उरली नाही. त्या या कार्डचा उपयोग करून आपल्या खात्यातील रक्कम पाहू शकतील!

'माणदेशी चेंबर ऑफ कॉमर्स' असी एक आगळी संकल्पना त्यांनी सन २०१२ मध्ये साकारली. या द्वारे महिलांना

मार्गदर्शनाबरोबरच त्यांच्या हाकेला धावून जाण्याचीही तयारी आहे. त्याला एक घटना कारणीभूत ठरली. बँकेकडून कर्ज घेऊन एका महिलेने चहाचा गाडा सुरू केला. त्या गाड्यावर चहा करण्यासाठी तिने गॅस सिलिंडर वापरला होता. पण तो कमर्शियल ऐवजी घरगुती होता. तेवढ्यावरून 'सक्षम' यंत्रणेने शुक्रवारी संध्याकाळी तिचा गाडा जप्त केला आणि त्या महिलेची रवानगी थेट कोठडीत केली. पुढचे दोन दिवस शनिवार-रविवारमुळे न्यायालय बंद होते. त्यामुळे तेवढा काळ तिला कोठडीतच काढावा लागला. त्या महिलेने मदतीसाठी बँकेत संपर्काचा प्रयत्न केला, पण तेथेही सुटी होती. या घटनेपासून बोध घेत हे 'चेंबर' सुरू करण्यात आले आणि त्या द्वारे गरजू महिलांना संपर्कसाठी १८००२१२२११२ हा 'टोल फ्री' क्रमांकही कार्यान्वित करण्यात आला.

हीं सारी कामे करत असतानाच बँकेने आपले सामाजिक भानही जागृत ठेवले आहे. २०१२च्या उन्हाळ्यात साऱ्या माणदेशवर नेहेमीप्रमाणेच दुष्काळाचे सावट होते. अशा स्थितीत बँकेने पुढाकार घेत म्हसवडमध्ये जनावरांची छावणी उघडली. दुष्काळात पैसे दिले की चारा तर मिळतो पण पाण्याचे काय? जिल्हाधिकाऱ्यांच्या व प्रशासनाच्या मदतीतून बँकेने सुरू केलेल्या या छावणीत दहा हजारांहून अधिक जनावरे जगविण्यात आली. चाऱ्याचा खर्च शासनाने दिला आणि मौल्यवान पाणी बँकेने टँकरद्वारे पुरविले...!

सामाजिक भान हे या बँकेच्या व्यवहाराचे आणखी एक वैशिष्ट्य. ज्या महिलांच्या नावावर प्रॉपर्टी असेल त्या महिलेला कर्जावरील व्याजदरात एक टक्का सूट दिली जाते. कर्ज महिलांनाच मिळते आणि एक टक्का कमी दराने मिळत असल्याने पुरूषही महिलांच्या नावावर प्रॉपर्टी नोंदविण्यास तयार होतात. अशा प्रकारे ६००० महिलांच्या नावावर प्रॉपर्टी लागण्यास बँकेचे धोरण कारणीभूत ठरले. बँक 'लिक्विड अॅसेट'साठी कर्ज देते. आणीबीणीच्या प्रसंगी तातडीने पैसे उभे करण्यासाठी महिला सोने खरेदी करतात, शेळी विकत आणतात किंवा म्हैस घेतात... अशा सर्व प्रकारांसाठी बँक कर्ज देते. ऐनवेळी उद्भवणाऱ्या अडचणीत महिलांना सावकाराकडे नव्हे तर बँकेकडे येणे विश्वासाचे वाटावे, या साठी हा प्रयत्न!

'माणदेशी'च्या प्रयोगांची दखल आता रिझर्व्ह बँकेनेही घेतली आहे. ग्रामीण भागातील बँकिंगमध्ये सुधारणांसाठी या बँकेचे अनुभव ते विचारात घेत आहेत. आता 'एचएसबीसी', 'डॉइश बँक', 'बोनिटा ट्रस्ट', 'सिडबी', 'गॉडफ्रे फिलिप्स', 'कॉमनवेल्थ ऑफ लर्निंग', 'असोसिएशन फॉर इंडियाज डेव्हलपमेंट' या सारख्या अनेक संस्था 'माणदेशी'च्या सहकार्यासाठी पुढे येत आहेत. विविध उपक्रमांत सहभागी होत आहेत. १९९७ मध्ये सुरू झालेला एक छोटासा प्रवास दीड दशकाच्या काळात खूप विस्तारला आहे. बँकेच्या ठेवी ५० कोटींपर्यंत पोहोचल्या आहेत. कर्जवाटप सुरू आहे आणि नियमीतपणे वसुलीही. मध्यमवर्गीय आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय लोक कर्ज बुडवीत नाहीत. गरीब लोकांची कर्ज परतफेडीतील नीतीमत्ता अधिक चांगली असते, यावर विश्वास ठेवून चेतना सिन्हा यांनी सुरू केलेल्या अनेक नव्या योजना यशस्वीपणे कार्यरत आहेत. विशेष म्हणजे अशा उदात्त हेतूने सुरू केलेली एकही योजना त्यांना बंद करावी लागली नाही!

एका महत्वाच्या टप्प्यावर पोहोचल्यानंतर चेतना सिन्हा आपल्या अनुभवातून बरेच काही सांगतात. त्या म्हणतात, ''लोक सांगतात ते ऐकत राहिले पाहिजे. ऐकायची सवय महत्वाची असते. प्रत्येकाने पारदर्शीपणे वागले पाहिजे. हे सोपे नाही पण ते साध्य केले पाहिजे. 'डबल लाईफ'मधून नुकसानच होत असते. ऐकण्याच्या सवयीतून फायदा होतो.'' नव्या पिढीसाठी त्या सांगतात, ''संयम आणि वक्तशीरपणा या दोन गुणांच्या आधारावर तुम्ही यशस्वी होऊ शकाल. यशस्वी होण्यासाठी तुम्ही असामान्यच असण्याची गरज नाही. एकाग्रता, बांधिलकी आणि संयम ही त्रिसुत्री अंगी बाणलेली असेल, तर यश तुमचेच आहे.''

चेतना गाला-सिन्हा

अध्यक्षा, माणदेशी महिला बँक, म्हसवड, ता. माण, जि. सातारा.

chetnavsinha@gmail.com / www.manndeshi.org